आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१० जानेवारी २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर, सोमनाथ स्वाभिमान पर्वासह विविध कार्यक्रमांना उपस्थित राहणार

- विकसित भारत युवा नेता संवाद २०२६ परिषदेचं केंद्रीय मंत्री मनसुख मांडवीय यांच्या हस्ते नवी दिल्लीत उद्घाटन

- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २८ जानेवारी ते २ एप्रिलदरम्यान होणार

- हिमाचल प्रदेशात काल झालेल्या बस अपघातातल्या मृतांची संख्या १४ वर

आणि

- मलेशिया खुल्या सुपर वन थाउजंड बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पी. व्ही. सिंधू हिचं आव्हान संपुष्टात

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर जाणार आहेत. सोमनाथ स्वाभिमान पर्वासह विविध कार्यक्रमांना ते उपस्थित राहणार आहेत. गीर सोमनाथ जिल्ह्यातल्या वेरावल इथं गुरुवारपासून सुरू झालेल्या चार दिवसांच्या सोमनाथ स्वाभिमान पर्वात सोमनाथ मंदिराच्या चिरस्थायी प्रेरणेचं स्मरण केलं जाणार आहे. याशिवाय, या दौऱ्यादरम्यान प्रधानमंत्री मोदी राजकोट इथं व्हायब्रंट गुजरात स्थानिक परिषदेचं उद्घाटन करतील, तर गांधीनगर इथं जर्मनीचे चान्सलर फ्रेडरिच मर्ज यांची भेट घेतील.

**<><><><><>**

देशाच्या भविष्याला आकार देण्यासाठी तरुणांची भूमिका महत्त्वाची असते, असं प्रतिपादन युवा कल्याण आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी केलं. विकसित भारत युवा नेता संवाद २०२६ परिषदेचं उद्घाटन मांडवीय यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं झालं, त्यावेळी ते बोलत होते.

***होल्ड... बाईट- मनसुख मांडवीय***

तंत्रज्ञान, उद्योग, प्रशासन, शाश्वत पर्याय आणि सामाजिक विकास अशा क्षेत्रांमध्ये विविध उपाय सुचवण्यासाठी तरुणांना प्रोत्साहन मिळावं हे या संवादामागचं उद्दिष्ट असल्याचं मांडवीय यांनी सांगितलं.

भारतापुढे केवळ देशाच्या सीमा संरक्षित ठेवण्याचंच आव्हान नाही, तर आर्थिक आघाडीवरही देशाला सज्ज राहावं लागतं, असं मत राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना व्यक्त केलं. तुम्ही युवा स्वतंत्र भारतात जन्माला आलात हे तुमचं भाग्य आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

५३वा नवी दिल्ली जागतिक पुस्तक महोत्सव आजपासून भारत मंडपम इथं सुरू झाला. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी या महोत्सवाचं उद्घाटन केलं. प्रकाशक, लेखक, वाचक आणि सांस्कृतिक वर्तुळातले प्रतिनिधी ९ दिवसांच्या या महोत्सवात एकत्र येत आहेत. ३५ देशांमधल्या १ हजारापेक्षा जास्त प्रकाशकांनी यात भाग घेतला आहे. विविध विषयांवरची असंख्य पुस्तकं इथं वाचकांसाठी उपलब्ध आहेत. यंदा या महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना, 'भारताचा लष्करी इतिहासः शौर्य आणि बुद्धिमत्तेची ७५ वर्षं' अशी आहे. या विशेष दालनात या संकल्पनेशी संबंधित ५०० पेक्षा जास्त पुस्तकं आणि शंभरपेक्षा जास्त कार्यक्रम नागरिकांना अनुभवता येणार आहेत.

**<><><><><>**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २८ जानेवारी ते २ एप्रिल यादरम्यान होणार आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी ही माहिती दिली. या अधिवेशनाचा पहिला टप्पा १३ फेब्रुवारी रोजी संपेल आणि दुसरा टप्पा ९ मार्च रोजी सुरू होईल. हे अधिवेशन म्हणजे अर्थपूर्ण चर्चा आणि नागरिक-केंद्रित प्रशासनाच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्ताननं आपल्या लष्करी आणि घटनात्मक संरचनेत तातडीनं केलेले बदल म्हणजे भारताशी झालेल्या संघर्षादरम्यान त्यांच्या यंत्रणेतल्या गंभीर त्रुटींचं निदर्शक आहे, असं प्रतिपादन संरक्षणदलप्रमुख जनरल अनिल चौहान यांनी काल केलं. पुणे सार्वजनिक धोरण महोत्सवात, तंत्रज्ञान आणि राष्ट्रीय सुरक्षा या विषयावरच्या

सत्रात ते बोलत होते. ऑपरेशन सिंदूरला फक्त स्वल्पविराम दिलेला आहे, याचा पुनरुच्चार त्यांनी केला. भारतीय सशस्त्र दलं इंटरनेट-केंद्रित युद्धनीतीकडून डेटा-केंद्रित युद्धनीतीच्या दिशेनं जात असून भविष्यातल्या सुरक्षाविषयक आव्हानांचा सामना करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असं चौहान यांनी सांगितलं.

<><><><><>

जागतिक हिंदी दिवस आज साजरा होत आहे. शिक्षण, सांस्कृतिक आदान-प्रदान यासह आंतरराष्ट्रीय स्तरावर हिंदी भाषेच्या वापराला प्रोत्साहन देणं, हे या दिवसाचं उद्दिष्ट आहे. २००६ मध्ये आजच्याच दिवशी नागपूरमध्ये पहिली जागतिक हिंदी परिषद आयोजित करण्यात आली होती. तेव्हापासून, दरवर्षी १० जानेवारी हा दिवस जागतिक हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो.

<><><><><>

हिमाचल प्रदेशमध्ये सिरमौर जिल्ह्यात काल झालेल्या बस अपघातातल्या मृतांची संख्या १४ वर पोहोचली आहे. या दुर्घटनेच्या चौकशीचे आदेश दिल्याचं हिमाचल प्रदेशचे उपमुख्यमंत्री मुकेश अग्निहोत्री यांनी आज सांगितलं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या अपघातात झालेल्या जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला आहे. प्रधानमंत्र्यांनी अपघातातल्या मृतांच्या कुटुंबांना २ लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये मदत जाहीर केली आहे.

<><><><><>

पंजाबमधल्या होशियारपूर-दसूया रस्त्यावर एक कार, पंजाब परिवहन मंडळाच्या बसला धडकून झालेल्या अपघातात ४ जण ठार झाले, तर एकजण जखमी झाला. दाट धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्यानं हा अपघात झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दुसरीकडे, राजस्थानच्या जैसलमेरमध्ये कमी दृश्यमानतेमुळे एक बस पोलिसांच्या वाहनाला धडकून चार पोलीस कर्मचारी जखमी झाले.

<><><><><>

मुंबईच्या गोरेगाव भागात भगतसिंह नगर इथं लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातले तीन जण मृत्यूमुखी पडले. आज पहाटे तीनच्या सुमाराला ही घटना घडली. अग्निशमन

दलाच्या जवानांनी तिघांना बाहेर काढून रुग्णालयात दाखल केलं, पण डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं.

<><><><><>

अंमली पदार्थांविरोधी देशव्यापी सामूहिक अभियान मोहिमेला येत्या ३१ मार्चपासून सुरुवात होईल, अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काल केली. नवी दिल्लीत नार्को-कोऑर्डिनेशन सेंटर म्हणजेच एनकॉर्डच्या बैठकीत ते बोलत होते. तीन वर्षं चालणाऱ्या या मोहिमेचा उद्देश देशाला अंमली पदार्थमुक्त करणे हा आहे. अंमली पदार्थांविरुद्धच्या या लढ्यात केंद्र सरकारच्या सर्व विभागांनी २०२९ पर्यंतचा कृती आराखडा तयार करावा आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी एक कालबद्ध यंत्रणा स्थापन करावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

<><><><><>

मलेशिया खुल्या सुपर वन थाउजंड बॅडमिंटन स्पर्धेत भारताचं आव्हान संपुष्टात आलं. महिला एकेरीत दोनवेळा ऑलिम्पिक पदकविजेती पी. व्ही. सिंधू हिला उपांत्य फेरीत चीनच्या वांग झी यी हिच्याकडून १६-२१, १५-२१ असा पराभव पत्करावा लागला. त्यापूर्वी, पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही जोडीही इंडोनेशियाच्या जोडीकडून पराभूत झाली होती.

<><><><><>

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या कालच्या पहिल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघानं गतविजेत्या मुंबई इंडियन्सवर ३ खेळाडू राखून विजय मिळवला. नवी मुंबई इथं झालेल्या या सामन्यात आधी फलंदाजी करताना मुंबई संघानं निर्धारित २० षटकांत ६ खेळाडू गमावून १५४ धावा केल्या.

<><><><><>

पाकिस्तानी सुरक्षा दलांच्या पाकिस्तानमधल्या खैबर पख्तूनख्वा प्रांतातल्या दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये ११ दहशतवादी ठार झाले. सुरक्षा दलांच्या माध्यम विभागानं आज ही माहिती दिली.

<><><><><>

बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे नेते तारिक रहमान यांची पक्षाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. माजी प्रधानमंत्री आणि प्रदीर्घ काळ पक्षाध्यक्ष राहिलेल्या खालिदा झिया यांच्या निधनामुळे हे पद रिक्त झालं होतं.

**<><><><><>**

इराणमध्ये सरकारविरोधी निदर्शनांचं लोण सर्व ३१ प्रांतात पसरलं आहे. २०२२ नंतरचं हे मोठं आंदोलन आहे. वाढती महागाई, बेरोजगारी आणि चलनाच्या अवमूल्यनाविरोधात नागरिक रस्त्यांवर उतरून आक्रोश करत आहेत.

**<><><><><>**

व्हेनेझुएलामधल्या लष्करी कारवाईनंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये तेल आणि वायू क्षेत्रातल्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली. व्हेनेझुएलातल्या पेट्रोलियमच्या साठ्याचा पुरेपूर वापर करण्यासाठी अमेरिकेला १०० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक मिळवायची असून, त्यासाठी तेल कंपन्यांनी पुढे यावं असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

तर, ग्रीनलँडवर ताबा मिळवणं अमेरिकेसाठी महत्वाचं असल्याचा पुनरुच्चार अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. अमेरिकेनं कोणतीही कारवाई केली नाही, तर रशिया आणि चीन यामध्ये हस्तक्षेप करतील, आणि त्यांना शेजारी म्हणून स्वीकारायची अमेरिकेची तयारी नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

दक्षिण कोरियाने हवाई क्षेत्राचं उल्लंघन करत आणखी एक ड्रोन सोडल्याचा आरोप उत्तर कोरियानं केला आहे. उत्तर कोरियानं प्रसारमाध्यमांना सांगितलं की ४ जानेवारीला दक्षिण कोरियातल्या इन्चेऑन या शहरातून हा ड्रोन उत्तर कोरियाच्या हवाई हद्दीत ८ किलोमीटर आत आला होता. तो पाडल्याचा दावा उत्तर कोरियानं केला आहे. त्यात टेहळणी कॅमेरे लावले असल्याचंही उत्तर कोरियाचं म्हणणं आहे.

**//<><><><><>//**